MHNG020020502026

दि. कि. अर्ज क्र. ३९३/२०२६
मंजु मिश्रा व इतर वि. निरंक

निशानि क्र. १ खालील आदेश

सदरचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळण्यासाठी ई–फाईलींगद्वारे केलेला आहे.

२. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले की, अर्जदार क्र. १ यांचे पती, अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील नामे महेन्द्र श्रीनाथ मिश्रा यांचे दिनांक ०३.१२.२०२५ रोजी नागपूर येथे आजारामुळे निधन झाले आहे. मयत महेन्द्र श्रीनाथ मिश्रा यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतीरीक्त इतर कोणिहि वारस नाहीत. मयत महेन्द्र श्रीनाथ मिश्रा व अर्जदार क्र.१ मंजु मिश्रा यांच्या नावे प्लॉट क्र. ८५, खसरा क्र. ७७, पी. एच. क्र. ११, सीटी सर्वे क्र. ८९, शीट क्र. २० (६५९) ६५३, ग्रीन फील्ड को. ऑप. हाउसींग सोसायटी, मौजा झींगाबाई टाकळी, नागपूर व सर्वे क्र.५६/३, पी. एच. क्र. ९, मौजा लींगा मांडवी, ग्राम पंचायत–पीपरी, तालुका कारंजा, जिल्हा वर्धा येथे संयुक्त मालमत्ता आहे. त्याकरीता अर्जदार यांना फेरफार नोंदी करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. अर्जदार यांनी दि. ०८.०५.२०२६ रोजी ई–फाईलींग द्वारे दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे व त्यात असे नमुद केले आहे की, टंकलेखनाच्या चुकीमुळे मयत यांचे नाव मृत्यु दिनांक ०३.१२.२०२५ ऐवजी दि. ०३.१२.२०१५ असे नमुद करण्यात आले आहे. सदरचा अर्ज मंजुर करण्यात आला व दि. ०८.०५.२०२६ रोजी व आदेश पारीत करण्यात आला.

**४.** अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र. १ यांचे साक्षी पुराव्याचे शपथपत्र ई–फाईलींगद्वारे नि. क्र. १३ वर दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ ने सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुनःउल्लेख करुन अर्जदारांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**५.** अर्जदारांनी ई–फाईलींगद्वारे कागद यादी निशानि ०४ सोबत मयत महेन्द्र श्रीनाथ मिश्रा यांच्या मुळ मृत्यु प्रमाणपत्राची व मुळ आधारकार्ड ओळखपत्राची स्कॅन प्रत, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या मुळ शाळा सोडल्याचा दाखल्याची स्कॅन प्रत, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या मुळ आधारकार्ड ओळखपत्राची स्कॅन प्रत, कर व आकारणी पावतीची स्कॅन प्रत, शेतीच्या विक्री पत्राची स्कॅन प्रत, गाव नमुना ७/१२ ची स्कॅन प्रत, अॅड. स्नेहल ज्ञानेश्वर ठाकरे यांनी दिलेल्या मुळ प्रमाणपत्राची स्कॅन प्रत दाखल केलेली आहे. तसेच, अर्जदार यांनी ई–फाईलींगद्वारे निशानि १४ वर पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

**६.** अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'नवराष्ट्र' या दिनांक १२.०४.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

**७.** वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या लाभात देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत महेन्द्र श्रीनाथ मिश्रा यांचे वारस आहेत हे घोषीत करुन अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क

भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

३. अर्जदार यांनी अर्जाचा खर्च सोसावा.

ARCHANA VISHAL KHEDKAR GARAD
Digitally signed by ARCHANA VISHAL KHEDKAR GARAD
Location: Nagpur
Date: 2026.07.10 17:54:11 +0530

(ए. व्ही. खेडकर – गरड)
३ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
नागपूर.

नागपूर.
दिनांक – १०.०७.२०२६

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file of order are true and correct as per the original order.

Sau. P. I. Geed - Stenographer (Grade - III)